नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १५/०४/२०२५ (मंगळवार)

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ८६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १५/०४/२०२५ रोजी मौदा पोलीस, पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, चिचघाट शिवार कन्हान नदीच्या पात्रातुन अवैध रित्या रेतीचे उत्खनन केले जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी जात असताना चिचघाटाकडे जाणाऱ्या रोडवर **ट्रक क्रमांक एम.एच.०६ ए क्यु ४४२५** आणि **ट्रक क्रमांक एम.एच.४० बी एल. ४४५६** अशा दोन ट्रक मध्ये जेसीबीने रेती उत्खनन करून भरतांना व उत्खनन केलेली रेती साठवुन ठेवलेली मिळुन आली. पोलीसांना येतांना पाहुन जेसीबी चालक जेसीबी सह पळुन गेला तसेच दोन्ही ट्रक चालक वाहन सोडुन पळुन गेले. साठवुन ठेवलेल्या रेती ढिगाऱ्याजवळुन पोलीसांनी दोन ईसमांना ताब्यात घेतले आणि त्यांची विचारपुस केली असता त्यांनी त्यांची नावे **आरोपी क्र १. आदेश राजहंस तळेकर, वय २४ वर्षे,रा. चापेगडी ता. कुही जि. नागपुर** असे सांगुन तो ट्रक क्रमांक एम.एच.०६ ए क्यु ४४२५ चा मालक असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **आरोपी क्र २. निर्धन खुशालरावजी निंबार्ते,वय ४६ वर्षे, रा. मांढळ ता. कुही जि नागपुर** असे असुन तो ट्रक क्रमांक एम.एच.४० बी एल. ४४५६ मालक असल्याची माहीती प्राप्त झाली. ट्रक मालकांना अधिक विचारपुस केली असता **आरोपी क्र. ३ ट्रक क्रमांक एम.एच.०६ ए क्यु ४४२५ चा चालक नामे यादवराव वाडीभस्मे रा. खरबी ता कुही** आणि **आरोपी क्र ४ ट्रक क्रमांक एम.एच.४० बी. एल. ४४५६ चा चालक नामे उपेश मारबते रा. पचखेडी ता. कुही** असे असल्याबाबत माहीती दिली. जेसीबी चालकाबाबत विचारपुस केल्यावर **आरोपी क्र .५ निकेश दुधपचारे रा. चापेगडी ता. कुही** आणि त्यांच्या सोबत **आरोपी क्र ६ रोशन मुंडले रा चिचघाट**

यांनी सुध्दा रेती उत्खनन करून रेती साठा करून ठेवल्याची माहीती प्राप्त झाली. मिळुन आलेल्या आरोपीतांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनामधुन **१) ट्रक क्रमांक एम.एच.०६ ए क्यु ४४२५ किंमती ३०,००,००० /— रूपये आणि ५ ब्रास रेती ३०,२५,०००/— रूपये २) ट्रक क्रमांक एम. एच.०६ ए क्यु ४४२५ किंमती ३०,००,०००/— रूपये ३) साठवुन ठेवलेली १५ ब्रास रेती किंमती ७५,०००/— रूपय असा एकुण ६१,००,०००/— रूपयाचा मुददेमाल घटनास्थळी जप्त केला आहे.**

नमुद ६ आरोपीतांविरूध्द कलम ३०३(२), ३ (५) भा.न्या.स. सहकलम ४८(७), ४८(८) महा. जमीन महसुल अधिनियम सहकलम ४,२१ खाण आणि खनिज अधिनियम सहकलम ३ सार्व. मालमत्ता नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद आहे. **पोलीसांनी दोन्ही ट्रक चालक आणि जेसीबी चालक यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांच्या ताब्यातुन एक जेसीबी क्रमांक एम.एच. ४०. पी. ए. ३९५५ किंमती २५,००,०००/— रूपये असा जप्त केला आहे. दोन्ही ट्रक मालक ,चालक आणि जेसीबी चालक अशा एकुण ५ आरोपीतांना अटक करण्याची प्रक्रीया सुरू आहे.**

**सदर कारवाईत एकुण ८६,००,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**





## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन वेलतुर** :– दिनांक १४/०४/२०२५ रोजी वेलतुर पोलीस, पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांना मौजा माजरी शिवार येथे एक निळया रंगाचा सोनालिका कंपनीचा ट्रक्टर क्र एमएच.४०.बिजे.९५५१ आणि त्यास संलग्न असलेली टॉली क्र एमएच.४०.एल.५६७३ मिळुन आले त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे चंद्रकुमार रामकृष्ण कुबडे वय ४० वर्षे. रा. देवळी कला, ता, कुही, हा मिळुन आला.** त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनामधुन **१) १ ब्रास रेती किंमती ५,००० /– रूपये आणि २) ट्रॅक्टर ट्रॉली किंमती ३,००,०००/– रूपये असा एकुण ३,०५,०००/–रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.स. सहकलम ४८(७), ४८(८) महा. जमीन महसुल अधिनियम सहकलम ४,२१ खाण आणि खनिज अधिनियम अन्वये गुन्हा नोंद आहे.

# अवैधरित्या देशी,विदेशी, मोहाफुल दारू बाळगणा—या आरोपीतांवर
# नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई
# ५७ आरोपीविरूध्द गुन्हे नोंद  एकुण ६३,३८५ /—रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक मा. श्री. हर्ष ए. पोद्दार यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक १४/०४/२०२५** रोजी दारूबंदी कायदाअंतर्गत कारवाई बाबत विशेष मोहीम राबविली असुन सदर मोहीमेदरम्यान नागपुर ग्रामीण जिल्हयाचे विविध पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, बोरी, बेला, कुही, भिवापुर, वेलतुर, उमरेड काटोल, नरखेड, कोंढाळी, देवलापार, पारशिवणी, खापा, केळवद, कळमेश्वर, खापरखेडा, अश्या पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या वर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू आणि साहित्य असा एकुण ६३,३८५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ५७ आरोपीतांवर ५७ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने